**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ  अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

www.prabhutarun.org

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

**वर्ष ८८ वे)** **प्रभुतरुण मुंबई, शनिवार, ता. १६ माहे जून, सन २०१२** **(अंक ९९३**

*संपादकीय*

## हे जगणे सुंदर . . .

**—सुहासिनी कीर्तिकर**



**विहंग नायक यांच्या स्मृतीला वंदन**

३० मे रोजीची सकाळ मैत्रीचा 'काळ' ठरली. एरवी मधुकर आणि प्रमिला तळपदेंच्या घरी जायचे म्हणजे मैत्रीचा हात धरून उत्साहाला, आनंदाला भेटणे असायचे. खिडक्याखिडक्यांतून हसणारी हिरवाई, टेबलावर विराजमान जिव्हासौख्य आणि सौख्यभरे नांदणारे प्रमिला-मधुकर दांपत्य; यांच्या सहवासात सुखाची चंगळ असायची. पण त्या दिवशीच्या सकाळी पारोशा उन्हात मंडळी त्यांच्या घरी जमली. संवाद हरवल्या अवस्थेत जमली. चिरनिद्रा घेणारे श्री. मधुकर पाहून गहिवरली. त्यांच्याबरोबरचे मैत्र आठवत राहिली.

मधुकर तळपदेंचे मैत्र सर्वांशीच. सर्वांशी म्हणजे सर्व ज्ञातीसंस्थांशी. सर्व ज्ञातीयांशी. कोणत्याही स्वरूपाचा सोहळा असो, उत्सव असो, उपक्रम वा मेळावा असो; ते जातीने त्यात सहभागी असत. वयोमान वाढले तरी काठीला सोबत वागवीत अशा सर्व कार्यक्रमांना ते हजर असत. एखाद्याच्या भाषणावर नर्म भाष्य करीत. प्रत्येकाच्या सांगण्यातील मजकुराचे परिशीलन करीत. गरज असेल तर अर्थसहाय्य करीतच; पण योग्य असा सल्लाही देत. 'कमी तेथे मी' ही त्यांची सहकारवृत्ती होती.

'जोगेश्वरी रिसॉर्ट'चे विश्वस्त, पाठारे प्रभू चॅरिटीझचे विश्वस्त, सोशल समाजाचे विश्वस्त या त्यांच्या अधिकृत भूमिका आणि जबाबदाऱ्या होत्या. पण त्या व्यतिरिक्त अनधिकृत किंवा नोंद न झालेल्या अशा अनेक जबाबदाऱ्या ते गाजावाजा न करता पार पाडीत. 'प्रभुतरुणा'च्या संदर्भातच हे घडलेले आहे. आमचे संपादक श्री. विहंग नायक यांच्याशी त्यांची गहिरी दोस्ती होती. विहंगच्या दुर्दैवी निधनापूर्वीची त्यांच्या आयुष्याची शेवटची रात्र मधुकर तळपदेंच्या सोबतच त्यांनी सुखसंवादात घालवली होती. ९ जून हा विहंगचा स्मृतिदिन. या जूनच्या अंकातच विहंगची आठवण काढत मधुकर तळपदेंवर लेख लिहावा लागावा हा दैवदुर्विलासच! विहंगच्या निधनानंतर 'प्रभुतरुण'चे संपादक कोण? कार्यकारी संपादक कोण? असे प्रश्न उभे राहिले. त्या संदर्भातील नवीन आखणीच्या सभेस मधुकर आणि प्रमिलाताई निमंत्रित हितचिंतक म्हणून आवर्जून उपस्थित राहिले. 'प्रभुतरुणा'ने घेतलेल्या समन्वयवादी भूमिकेचे त्यांनी नेहमीच

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## वलय

**—संजना कोठारे**

'चढाओढ या शब्दाचा अर्थ आपण किती उलटा लावतो, कोणी वर चढताना दिसलं की लगेच खाली ओढायला धावतो.' कवी चंद्रशेखर गोखलेंनी जीवनाचा पैलू इतका सहज आणि सोप्या भाषेत टिपला आहे की त्यांच्या चारोळ्याची आठवण प्रत्येक क्षणाला येत असते. बरेचदा हे कटुसत्य आपल्याला आढळतं आणि निराशाजनक उद्‌गार काढून त्या क्षणाला घडलेल्या घटनेला आपल्या आयुष्यातला एक वाईट अनुभव समजून दुर्लक्ष करतो. नवल म्हणजे ही भावना लहान वयातच आपल्या मुलांच्या अंगवळणी पडते आणि त्यासाठी आपण जबाबदार आहोत. शाळेपासूनच मुलांच्या डोक्यात बिंबवलं जातं की, 'तुला त्याच्यापेक्षा अधिक गुण मिळवायला पाहिजेत.' तेव्हापासूनच सुरू होतो हा खेळ ज्याचा उगम एका निरोगी स्पर्धेतून होतो, परंतु अशा एका दर्जाला पोहोचतो की तिथे केवळ आपल्याला आपलाच स्वार्थ दिसतो आणि आपलं ध्येय मिळविण्याकरता आपण वाटेल ते करायला मागेपुढे पहात नाही. तेव्हा समोरची व्यक्ती आपली प्रतिस्पर्धी आहे आणि आपल्यापेक्षा अधिक यश त्या व्यक्तिला मिळू नये अशी क्रूर भावना मनात येते. नोकरीत असो वा धंद्यात, शिक्षण संस्थेत असो किंवा चित्रपट, नाटक क्षेत्रात, कुलीन कारणाच्या व्यवसायातसुद्धा कोणी दुसऱ्याला आपल्यापेक्षा यशस्वी होताना पाहू शकत नाही. स्वत:च्या व्यवसायातच कशाला? कोणी काहीही चांगले कार्य करीत असले तरी त्या व्यक्तीवर खोटे आरोप आणि त्याची बदनामी करून त्यांना खाली खेचले जाते. याची उदाहरणे आपल्याला प्रत्येक घटकेला आढळत असतात. वर चढताना खाली खेचणं हा तर मनुष्याचा जणू गुणधर्मच आहे आणि या चढाओढीतून कोणीच सुटलेले नाही.या कलियुगात मनुष्याकडून असा व्यवहार घडणे आश्चर्यजनक बाब नाही. कारण या युगात मनुष्याला 'जीवन' कसे जगावे हेच कधी शिकवले गेले नाही. मुख्यत: मनुष्याला जीवनाचा अर्थच माहीत नाही ज्यामुळे ही परिस्थिती अशीच निकृष्ट होत राहणार. जोपर्यंत आपण जीवनाचा अर्थ जाणत नाही आणि त्यापेक्षा आपल्या येणाऱ्या पिढीला त्याची शिकवण देत नाही तोपर्यंत ही भावना मनातून कधीच जाणार नाही. एक गोष्ट मात्र मला प्रकर्षाने जाणवली होती की जरी आपआपल्या क्षेत्रात कोणी आपल्या पुढे कोणाला जाऊ देत नसले तरी काही समाजात ते एकमेकांना मदत करायला हलगर्जीपणा करीत नाहीत. उलट समोरची व्यक्ती आपल्या समाजाची आहे हे त्यांना कळताच त्या व्यक्तीला इतरांमधून पसंत केले जाते. जरी हा पक्षपात योग्य नसला तरी आपल्या माणसांना प्रोत्साहन आणि मदत करण्याची प्रवृत्ती ही केवळ इतर समाजांमध्ये आढळते. दक्षिण भारतीय असो किंवा गुजराती असो, ते आपल्या समाजाच्या व्यक्तीला कायम प्रोत्साहन देत असलेले आपण सर्वजण पाहतो. परंतु ही एक निराशाजनक बाब आहे की, 'मराठी माणूस' जो 'मान मोडेल पण वाकणार नाही'चा वृथा अभिमान बाळगतो. तो मुळात कोणाची मदत घेणे सोडा; मदत

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

कौतुक केले अन् हो! माझ्या लेखनाबद्दल, वक्तृत्वाबद्दल त्यांना अपार कौतुक होतेच.

हे कौतुक ते करायचे बऱ्याचदा फोनवरील संभाषणात. एकदा त्यांचा फोन आला असता आधी तो माझ्या मुलीने- अनुराधाने घेतला. माझे बोलणे झाल्यावर तिने कोण?- म्हणून सहज विचारले. 'मधुकर तळपदे' असे मी सांगताच तिची त्यांच्या फोनवरील आवाजाबद्दल उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती- 'व्हॉट अ व्हॉईस!' खरंच; गहिरा, खर्जातला असा तो भारावून टाकणारा त्यांचा आवाज होता. त्यामागच्या निर्मळ मनानं ही गहिराई आणखी वाढती असायची. माझी नात तर त्यांना 'टॉल मॅन'च म्हणायची. सर्वार्थानं ते 'टॉल मॅन' होते अन् केवळ आवाजच नव्हे; तर त्यांचं अवघं व्यक्तिमत्वच भारावून टाकणारे होते.

'आम्ही मायदेशी- मुलं परदेशी' अशी अवस्था हल्ली अनेकांची असते. मधुकर आणि प्रमिला यांची चंद्रू अन् सलील ही मुले परदेशात. ती दोघेच इथे. अशावेळी इथे कसे आनंदाने जगायचे याचा आदर्शच त्यांनी आपल्या जगण्यातून घालून दिला होता. अशा तऱ्हेनेच जगण्याचे बळ मधुकरांच्या मागे उरलेल्या प्रमिलाताईंना मिळो!

'सांगा कसे जगायचे?
हसत हसत
की
रडत कुंथत?'

असा प्रश्न फक्त मंगेश पाडगावकरांनाच पडतो असं नाही. आपल्या सगळ्यांनाच तो पडतो. त्याचं उत्तर ज्यानं त्यानं द्यायचं! पण मनापासून वाटतं की हे उत्तर शोधण्याची गरजच नाही. श्री. मधुकर यशवंत तळपदे यांनी हे उत्तर सगळ्यांसाठी शोधूनच ठेवलेलं आहे. नुस्तं ठेवलेलं नाही; त्यांनी तसं हसत हसत जगूनच दाखवलेलं आहे.

त्यांच्या या जगण्याला सलाम! म्हणूनच ते आपल्या सर्वांच्या आठवणींतून जगतच राहणार!!

*

(पान १ कॉलम ४ वरून)

करायलासुद्धा जात नाही. आश्वासने बरेच देतात परंतु एखाद्या मराठी भाषिकाला 'आपला माणूस' म्हणून कधीच प्रोत्साहन दिले जात नाही.

माझे हे वाक्य बऱ्याच जणांना पटत नसेल तरी ते कटुसत्य आहे जे आपल्याला प्रत्येक ठिकाणी आढळते. परंतु या सत्याबरोबर अजून एक सत्य आहे आणि ते म्हणजे `There is an exception to every rule.' मला अत्यंत आनंद झाला जेव्हा माझी 'मराठी' माणसांबद्दलची निराशा दूर झाली. मराठी माणसांनी आपल्या माणसांसाठी काहीतरी करण्यासाठी जे परिश्रम घेतले त्याचे ज्वलंत उदाहरण पाह्यला मिळाले आणि या गोष्टीचा अत्यंत अभिमान वाटला. २६ मे २०१२ रोजी रंगशारदा सभागृहात 'वलय प्रतिष्ठान' प्रस्तुत दोन अंकी नाटक 'शकून'चा पहिला प्रयोग झाला. पूजा अमर अजिंक्य यांनी आपल्या १७ पाठारे प्रभू कलाकारांना घेऊन त्यांचे पहिले व्यावसायिक नाटक सादर केले. याबद्दल पूजा अजिंक्यचा प्रचंड अभिमान वाटतो. अथांग परिश्रमांनी पूजानी आपल्या कलाकारांना त्यांच्या भूमिकेसाठी तयार केले कारण किशोर जयकर आणि स्वाती राणे यांना वगळता इतर सर्वच पात्रे पहिल्यांदाच व्यावसायिक पातळीवर प्रयोग करीत होते. पूजा अजिंक्यने गेली काही वर्षे याच संघाबरोबर प्रभुतरुण आणि सोशल समाजासाठी एकांकिका, नाट्यप्रयोग केले आहेत आणि तेव्हापासूनच जणू पूजाचे नाट्यशिबीर सुरू झाले. आपल्याकडे असणाऱ्या कलाकारांच्या गुणवत्तेला वाव देण्याची योजना जी पूजानी योजिली त्याचे रूपांतर त्यांच्या पहिल्या प्रायोगिक नाटकात झाले. १७ अतिशय गुणी आणि मेहनती कलाकारांच्या साथीमुळे पूर्ण नाटकात जणू एक सकारात्मक वलयच तयार झाले होते.

'शकून'चे लेखन आणि दिग्दर्शन हे स्वतः पूजा अमर अजिंक्यनी केले. मूळ कथेचे लेखन शुभदा कुलकर्णी यांचे होते. उत्कृष्ट नेपथ्य आणि प्रकाशयोजना सांभाळून अमर अजिंक्य यांनी पूजाला उत्तम साथ दिली. प्रकाशयोजनेसाठी अमर अजिंक्यना साथ दिली होती विजय गोळे यांनी. उत्कृष्ट नेपथ्य करून एका व्यावसायिक पातळीवरच्या नाटकाच्या सगळ्याच गरजा पूर्ण केल्या होत्या. एक अतिशय सकारात्मक वलय पूजा आणि तिच्या संघाच्या भोवती होते ज्यामुळे त्यांना कितीही अडथळ्यांना सामोरे जावे लागले तरी त्यांची जिद्द आणि पूर्ण संघाच्या एकीमुळे आणि सकारात्मक प्रवृत्तीमुळे हे प्रयोग यशस्वी झाले. एकापाठोपाठ दोन प्रयोग हा आपल्या ज्ञातीतील विक्रमच. 'शकून'च्या भूमिकेत मृगा कोठारे आणि कॅप्टन अश्विन प्रधान यांनी `आदिनाथ'च्या भूमिकेत अत्यंत सहज कामगिरी बजावली आणि त्यांच्या पात्रांना न्याय दिला. करिष्मा कीर्तिकरनी आदिनाथच्या बायकोची भूमिका इतकी सहजरित्या निभावली की ती नाटकाचा प्रयोग करीत आहे असे अजिबात जाणवले नाही. भारती विजयकर यांनी काकूची भूमिका सहज आणि सफाईपूर्ण निभावली. राज विजयकर, निहाल कीर्तिकर, ऐश्वर्या अजिंक्य यांनीसुद्धा आपल्या पात्रांना न्याय दिला आणि मुख्यतः पाठारे परभांची युवा पिढी असूनसुद्धा त्यांचे मराठी शब्दांचे उच्चार स्पष्ट होते याचा प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो. याचे श्रेय पुन्हा दिग्दर्शिका पूजा अजिंक्य यांनाच जाते. स्वप्नील कीर्तिकर आणि प्रीती धैर्यवान यांनी 'मामा'ची भूमिका बखुबी बजावली. अतिशय गोड आणि सुंदर बाल कलाकार अनित्रा धैर्यवान रंगभूमीवर अगदी सहज वावरत होती. अमर अजिंक्य यांनी आपल्या लहान भूमिकेतूनही आपला ठसा उमटविला. डॉक्टर पवन कीर्तिकर, तुषार कीर्तिकर, सुजाता कीर्तिकर आणि शैलेश विजयकर यांनी सुंदर साथ दिली. गंभीर विषयावर असलेल्या नाटकाचे गांभीर्य सांभाळले किशोर जयकर आणि स्वाती राणे यांच्या व्यावसायिक अभिनयानी. हलका विनोद आणि हशे पटकावले 'चिंधी'च्या भूमिकेत आशिष देसाई यांनी. आशिषकडून हीच अपेक्षा होती आणि तो त्याला पुरेपूर खरा उतरला.

सर्व कलावंतांच्या अभिनयातून त्यांचे कष्ट आणि परिश्रम दिसून येत होते. त्याचबरोबरीने पूजा अजिंक्यनी या कलाकारांवर घेतलेली मेहनतही दिसून आली. कारण याच कलाकारांना तिने व्यावसायिक पातळीसाठी प्रोत्साहन देऊन त्यांना व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण करण्याची संधी दिली. अतिशय नाजूक विषय पूजानी आपल्या दिग्दर्शनाने सुंदररित्या हाताळला आहे आणि नाटकाला योग्य ठिकाणी विनोद देऊन नाटकाचा समतोल सांभाळलाय. आपल्या माणसांना प्रोत्साहन देऊन पूजाच्या भोवतीचे हे वलय नक्कीच सकारात्मक ऊर्जा देतेय. पूजा अजिंक्यच्या या वलय प्रतिष्ठानला त्याच्या पुढच्या वाटचालीसाठी आणि आगामी प्रयोगांसाठी प्रभुतरुणतर्फे प्रेमाचा 'शकून'!

*

# ग्रेस आणि मी

**-मृदुला जोशी**

आज सकाळी ग्रेस गेले. बातमी अर्थातच अनपेक्षित नव्हती. पण तरीही कानावर पडली तेव्हा काळीज गलबलून गेलं. पुन्हा असा कवी होणार नाही असंही वाटून गेलं.

माझा आणि त्यांचा संबंध खूप जुना. १९७२ साली मी पॉप्युलर प्रकाशनात मराठी पुस्तकांची संपादक म्हणून काम करायला सुरुवात केली तोपर्यंत त्यांची 'संध्याकाळची कविता' खूपच गाजलेली होती. 'नवे कवी नवी कविता' या मालिकेतले रामदास भटकळ ह्यांनी प्रकाशात आणलेले पहिले मोठे कवी म्हणून त्याचं नाव घेतलं जात होतं. कवी हीच त्यांची ओळख होती. अशा परिस्थितीत रामदासांनी त्यांचं ललित लेखांचं पुस्तक काढायचं ठरवलं. 'चर्चबेल' हे त्या संग्रहाचं नाव. त्याचं काम माझ्याकडे आलं. मला ह्या संधीचा अपरंपार आनंद झाला. कारण त्या निमित्तानं माझा ग्रेसशी परिचय झाला असता. पण लवकरच लक्षात आलं की ते शक्य नव्हतं. कारण ग्रेस नागपूरला राहत होते आणि केवळ पुस्तकाच्या कामासाठी ते मुंबईला येऊ शकत नव्हते. उलटपक्षी ते रामदासांना नागपूरला बोलावत असत. ह्या परिस्थितीत मला त्यांच्याशी पत्रव्यवहार करण्यावाचून गत्यंतरच नव्हतं. आणि तीच सुवर्णसंधी मी साधली. १९७४ साली 'चर्चबेल' निघालं तोपर्यंत ग्रेसच्या आणि माझ्या पत्रांची एक मोठी फाईल तयार झाली होती. आजही तो आमचा एक अविस्मरणीय ठेवा आहे.

ग्रेसची पत्रं जितकी वाचनीय तितकीच देखणी. अप्रतिम सुंदर हस्ताक्षर. फार पूर्वी ते शाईच्या पेनानं लिहीत, पण नंतरनंतर त्यांना त्या काळात दुर्मीळ असलेल्या स्केचपेनाची गोडी लागली. इतकी की त्या काळात कुणी त्यांना 'तुम्हाला कुठली भेट आवडेल?' असं विचारलं तर तात्काळ ते म्हणत, 'निळीजांभळी स्केचपेनं!' आणि आपण ती त्यांच्या हातात ठेवली की त्यांना एखाद्या लहान मुलासारखा आनंद व्हायचा.

मोजक्या शब्दात जास्तीत जास्त आशय व्यक्त करणारी, सुंदर अक्षरातली ती आंतरदेशीय पत्रं हातात पडली की हरखून जायला व्हायचं. असंच कधीतरी त्यांच्या पत्रात मी 'ललितबंध' हा शब्द वाचला. लगेच मी पत्र लिहिलं- 'तुम्हाला ललित निबंधाच्या जागी ललितबंध म्हणायचं आहे का?' लगेच उत्तर आलं, 'तुम्हाला आवडला असेल तर तो शब्द ठेवायला हरकत नाही.' आणि असा तो शब्द 'चर्चबेल'च्या निमित्ताने रूढ झाला.

त्यानंतर त्यांचा आणि माझा संबंध आला तो 'चंद्रमाधवीचे प्रदेश' ह्या कवितासंग्रहाच्या निमित्तानं. ह्यातल्या कवितांची निवड, त्यांची मांडणी , सुभाष अवचट ह्या ग्रेसइतक्याच थोर प्रतिभावंताकडून सुयोग्य चित्रं आणि मुखपृष्ठ काढून घेणं, ती ग्रेसकडून मान्य होणं हा सगळासगळा प्रवास निव्वळ पत्रव्यवहारातून झालेला आहे असं आज मी सांगितलं तर कुणाचा विश्वास बसणार नाही. ग्रेसना हवं तसंच कल्पना प्रेसमधून छापून घेण्याची जबाबदारीही माझीच होती. ह्या सगळ्या प्रक्रियेत मी ग्रेसच्या कवितेत गुंतून गेल्यामुळेच हे शक्य झालं. एका प्रकारे घरीदारी मी सतत ग्रेसच्या कवितेचा उल्लेख करीत असल्यामुळे आपोआप माझ्या १० वर्षांच्या मुलीलाही त्यांच्या कित्येक कविता पाठ झाल्या आणि ती जेव्हा त्या म्हणून दाखवे तेव्हा लोकांना आश्चर्यच वाटायचं- कारण ग्रेसच्या कविता पाठ झाल्या आणि ती जेव्हा त्या म्हणून

(पान ५ कॉलम ३वर)

लेखांक-६

# कालची मुंबई-आजची मुंबई

— विश्वास नारायण अजिंक्य

१७ फेब्रुवारी १८०३ मध्ये मुंबईच्या किल्ल्यातील वस्तीला आग लागली होती. तिने वस्तीच्या फार मोठ्या भागाला भस्मसात केले होते. आग कशी लागली हे कधीच कळले नाही. वाऱ्याच्या वेगामुळे आग मंदावण्याऐवजी तिचा भडका वाढतच गेला होता. त्या दिवसात किल्ल्यातील घरे लाकडी असल्याने त्यांची आगीला मदतच झाली होती. दुसऱ्या दिवशी आरमारावरील खलाशी आग विझविण्याची सर्व आयुधे घेऊन किनाऱ्यावर आले. सुदैवाने आग विझविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना यश लाभले. या आगीत ४७१ घरे, ६ पूजास्थाने व ५ लष्करी बराकी भस्मसात झाल्या.

१४ एप्रिल १९४४ हा दिवस तर मुंबइच्या नागरिकांना ऐतिहासिक वाटण्यासारखा आहे. यादिवशी व्हिक्टोरिया डॉकमध्ये उभ्या असलेल्या फोर्ट स्टिकाईन या बोटीवर दुपारी चार वाजल्यानंतर दोन स्फोट झाले. या बोटीत १२०० टन स्फोटक द्रव्ये व अन्य ज्वलनशील माल होता. त्या स्फोटात स्टिकाईन जहाज तर नष्ट झालेच; पण त्या शेजारी उभे असलेले जलपद्म हे जहाजही २५ फूट उंच बंदरावर फेकले गेले. हजारो टन पाणी आकाशात उंच उडाले. जळत्या लोखंडाचे शंभर टनी वजनाचे तुकडेसुद्धा दूरवर उडाले. गोद्यांमध्ये आगी भडकल्या. आजुबाजूच्या परिसरातील अनेक इमारती कोसळल्या. फोर्ट स्टिकाईन जहाजात असलेल्या सोन्याच्या विटाही पाच मैलाच्या परिघात फेकल्या गेल्या. त्यातल्या फारच थोड्या सरकार जमा झाल्या. इमारतीच्या ढिगाऱ्याखाली हिरे, नोटाही सापडल्या. कोसळलेल्या इमारतीचे ढिगारे इतके प्रचंड होते की ते हलविण्यासाठी बुलडोझर वापरावे लागले. अग्नीशामकदलाचे जवान, जहाजा-वरील लोक व इतर मिळून ५००च्यावर लोक मरण पावले; तर हजारो जखमी झाले. कित्येक टन धान्य जळून भस्मसात झाले. या स्फोटाच्यावेळी अग्नीशामकदल, नौदल, लष्कर, हवाईदल, पोलीस यंत्रणा यांनी धडाडीने मदत कार्य केले.

स्फोट झाला ते दिवस दुसऱ्या जागतिक महायुद्धाचे. दिवस लढाईचे. त्यात स्फोटाचे कानठळ्या बसविणारे आवाज. त्यामुळे अफवांना ऊत आला होता. कोणाला हा जपानी पाणबुडीचा खेळ वाटत होता; तर कोणाला जर्मन विमानांची किमया वाटत होती. बंदर भागातील शेकडो लोक घाबरून आपल्या राहण्याच्या जागा सोडून शहरात इतरत्र गेले होते. तर कित्येक लोक शहराला रामराम ठोकून अन्यत्र गेले होते. स्फोट झाला त्या जागेवर मृतांचे स्मारक उभारले असून त्याचे उद्‌घाटन १४ एप्रिल १९७१ रोजी करण्यात आले. तेव्हापासून दरवर्षी १४ एप्रिलपासूनचा आठवडा अग्निशामक सप्ताह म्हणून पाळला जातो.

१८९६च्या हिवाळ्यात प्लेगने थैमान घातले होते. हा रोग नंतर इतका झपाट्याने पसरला की एका रोग्याच्या प्रेताला दहन करून घरी परत यावे; तर दुसऱ्या प्रेताच्या स्मशान यात्रेच्या तयारीला लागावे. तर १९१८ साली 'इन्फ्लुएन्झा' नावाच्या रोगाने साऱ्या देशावर आक्रमण करून महिना दीड महिन्यांच्या अवधीत लाखो लोकांना इहलोकातून उठविले होते. 'इन्फ्लुएन्झा'च्या मदतीला काही दिवस कॉलरासुद्धा होता. त्यावेळी मृतांची संख्या इतकी प्रचंड होती की, मुंबईच्या स्मशानातून जळाऊ लाकडांचा पुरवठा कमी पडू लागला होता व स्मशानात दहनासाठी नंबर लावावा लागत होता.

ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत मुंबई शहरात भटक्या कुत्र्यांना ठार मारण्यासंबंधी एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी कायदा करण्यात आला होता. भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट आत्ताप्रमाणे पूर्वीही होता. भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कंपनी सरकार वर्षातून ३-४ महिने भटकी कुत्री मारून टाकण्याचा हुकूम जारी करे. मारलेल्या प्रत्येक कुत्र्यास आठ आणे बक्षिस मिळे. त्यासाठी जाहिराती छापून जागोजागी चिकटवीत. दवंडी पिटवीत. मारलेली भटकी कुत्री पोलीस चौकीत दाखविल्यावर बक्षिस मिळत असे. ही प्रथा बरीच वर्षे चालू होती. पण दर कुत्र्यामागे आठ आणे मोबदला घेण्यास सोकावलेल्या लोकांनी फक्त भटक्या कुत्र्यांना ठार मारण्याचा हुकूम असताना हिंदू तसेच पारशी लोकांच्या घरातल्या ओट्यावर बांधलेल्या कुत्र्यांनाही जबरदस्तीने पकडून मारण्याचा उद्योग सुरू केला होता. ६ जून १८३२ रोजी कुत्री मारणाऱ्या लोकांनी काही पारशांच्या घरात घुसून पाळलेल्या कुत्र्यांना पकडून नेले. त्यामुळे पारशी भडकले. शे-पाचशे पारशांनी एकत्र येऊन ७ जून रोजी दुकाने बंद करून हरताळ पाळण्याचे ठरविले. देशातील हा पहिला 'बंद'चा कार्यक्रम! किल्ल्यात राहणाऱ्या इंग्रजांना रोजचे खाणे, फळे, मटण, रोटी, पाव मिळू नये अशी व्यवस्था केली होती. मटण-पाव घेऊन जाणाऱ्यांचा माल लुटून दंगेखोरांनी किल्ल्यासमोरच्या खंदकात फेकून दिला. सरकारी कार्यालयात काम करणाऱ्यांना रोखण्यात आले. काही पारशांनी मुंबईतील सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सर जॉन ऑड्री यांची घोडागाडी अडवून तीत कचरा व मेलेल्या घुशी टाकल्या. अखेर दुपारी दोन-तीन वाजता कुलाब्यावरून लष्करी शिपायांची पलटण आणून दंगेखोरांवर जरूर पडल्यास गोळ्या झाडण्याचा हुकूम दिल्यावर दंगा थांबला. दंगल करणाऱ्यांना पकडून २-३ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. १८७२ साली मुंबई महापालिका अस्तित्वात आल्यानंतर भटक्या कुत्र्यांना पकडण्याची व मारण्याची जबाबदारी पोलीस आयुक्तांकडून काढून मुंबई महापालिकेकडे सोपविण्यात आली.महापालिका १९९४ पर्यंत भटक्या कुत्र्यांना पकडून मारण्याचे किंवा त्यांच्या निर्बिजीकरणाचे काम निर्वेधपणे करीत असे, पण काही श्वानप्रेमी, स्वयंसेवी संघटनांनी 'कुत्री वाचवा' मोहीम हाती घेऊन मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली व १९९४ साली उच्च न्यायालयाने कुत्री मारण्याच्या महापालिकेच्या कामाला स्थगिती दिली.

सुरतेस इंग्रजांचे मुख्य ठाणे असताना त्यांच्या वस्तीची, पोटापाण्याची व्यवस्था ईस्ट-इंडिया कंपनीतर्फे होत असे. तेथे इंग्रजाला स्वत:साठी काही करावे लागत नसे. सकाळी नोकरीचे काम सुरू व्हायचे ते दुपारी बंद. मग जेवण. अन्न शिजविण्यासाठी निराळी माणसे असत. मुंबई बेटसुद्धा ताब्यात आल्यावर सुमारे दीडशे वर्षात इंग्रजांना हॉटेलची गरज कधीच वाटली नाही. एकोणीसाव्या शतकाच्या आरंभी ईस्ट इंडिया कंपनीबरोबरच इंग्लंडमधील इतर व्यापारी वर्गालादेखील इंग्रजांनी जिकलेल्या भारतीय भागात स्वतंत्रपणे व्यापार करण्याची परवानगी मिळाल्यामुळे सर्वत्र इंग्रजांची वस्ती वाढली व त्यांना आपल्या पोटापाण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. त्याकाळी उद्योगधंदा किंवा नोकरीनिमित्त येथे येणारे इंग्रज बहुधा एकटेच येत. येथे आल्यावर घर, नोकरचाकर ठेवायचे अन् मग बायको व इतर नातेवाईक आणायचे. एकटे असताना प्रत्येकाला स्वयंपाकी व इतर घरकामाचे नोकर बाळगणे शक्य नसल्याने त्यांच्यासाठी हॉटेल, क्लबसारख्या संस्था निघाल्या. तर बर्फाचा परिचय मुंबईकरांना १८३५ मध्ये सर्वप्रथम झाला. अमेरिकेच्या जहाजातून बर्फ इथे येऊ लागला. आरंभी फक्त श्रीमंत पारशी लोकच त्याचा वापर करीत. हा बर्फ साठविण्यासाठी वर तोंड असलेल्या घुमटाच्या आकाराचे कोठार बांधले होते. त्याला लोखंडी शिडी लावून माणूस आत उतरे व गिऱ्हाईकाला बर्फ आणून देई. पुढे बर्फाचा खप वाढला. आयातही वाढली. सुमारे २५ वर्षे अमेरिका बर्फ पुरवीत होती. तिकडून बर्फ येण्याचे थांबले तेव्हा 'बर्फाची सरकारने व्यवस्था करावी' या मागणीसाठी मुंबईतील थोरा-मोठ्यांचे शिष्टमंडळ सरकारकडे गेले होते. पुढे १८६२ मध्ये येथे बर्फाचे कारखाने निघाले.

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# YUVA MANCH

Together Towards Tomorrow

**Prabhu Tarun Website :** prabhutarun.org

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us, so that we can provide you with your new user IDs.

## THOMAS & FRIENDS

**-Prajakta Kothare Rajpurkar**

When I was asked to write something for PP newsletter, I had been scratching my head off about, what to write???? I came up with many ideas and discarded them, then suddenly tonite I decided to go with this topic. Which is 'Thomas & Friends'.

Although, it's something which might fascinate young and adult, that's not the only reason why I chose this topic. I have gathered extensive knowledge of it as my son is the big fan of it since he was a year old and has at least half of all those engines in his collection and never ever tires of playing with it. Surprisingly once I started digging up more information for this write up, some of it even surprised me.

Thomas the tank engine (known as 'Thomas and Friends' since 2002), is a fictional steam locomotive in the 'The Railway Series' books by Reverend Wilbert Awdry and his son, Christopher. Although, there are many engines being seen in the serial and movies since 1984, Awdry wrote those stories or rather invented them in 1943 to amuse his son Christopher during a bout of measles. Thomas, which is the main character in these stories appeared in 1946 in the second book in the series. In 1979, the British writer/ producer Britt Allcroft came across the books and arranged the deal to bring stories to life as Thomas the Tank Engine and Friends.The programme became a success and also started money making through commercial products (which probably bring more money than the selling of Thomas stories on paper or video).

The series and the movies has main eight engines which live in a shed called Tidmouth Shed. Those eight engines are- Thomas, his best friend Percy, James, Gordon, Emily, Henry, Edward and Toby. The stories teach children patience, friendship, honesty, dignity (Gordon's trademark words "Oh!! Indignity."), integrity, helping each other, and so many more things. Each story brings something new and something to learn. And mainly it is fabulous to watch on video, even for adults they just love it. There are N, HO scale models which are on the big display and adults keep collection of it and build train displays. Everywhere in the world there are trains made looking like Thomas & Friends and children and adults like to ride in it for fun.

The information that I didn't know was, children with autistic spectrum disorders like playing or associating particularly with Thomas more than any other engine or any other toy. The studies have shown that Thomas the Tank Engine helps break through the barriers of many children with autism and Asperger Syndrome. It also helps their emotional and social development.

So next time when you see Thomas and Friends you will know much more about it and may look at it differently.

⁕


## MAHABALESHWAR

*COME HERE TO EXPIRIENCE TO NATURE AT ITS BEST WITH*
*JASMINE COTTAGE*




**THE COTTAGE OFFERS 4 SPACIOUS ROOMS . IT PROVIDES ACCOMODATION FACILITIES TO SUIT THE BUDGET OF THE TOURIST**
**ALL THE ROOMS HAVE SERENE ENVIRONMENT AND OPEN SIT-OUT VARANDA WHERE GUESTS CAN SIT AND ENJOY THE PLEASANT BEAUTY OF THE NATURE**

**FACILITIES:**

- Attached bath
- Hot & Cold Running water
- Television with Satellite Connection
- Car Parking
- Large open area for playing outdoor games

**Location:**

It is located near the market in Mahabaleshwar within close proximity of bus stand in the gorgeous land of Mahabeleshwar.

**For Booking Contact:**
**Velkars 9930172689 9220451465**


## Chilli Crab Singapore Style

**Ingredients:**

• Crabs (approx. 300 grams), • 2 cups of water, • 2 tablespoons cooking oil, • 5 tablespoons tomato ketchup, • 3 tablespoons chilli sauce, • 1 tablespoons soy sauce, • 1 tablespoon tamarind paste • 2 tablespoon small chopped ginger and garlic, • 1 tsp White sugar, • 2 tsp Red chilly powder, • 2 eggs white, • 2 tablespoon spring onions chopped, • 1 tsp cornflour, • 1 tsps fresh lime juice, • 2 tablespoons chopped fresh coriander leaves, plus more for garnish, • Salt as per taste

**Directions**:

• In a bowl mix the ketchup, chilli sauce, soy sauce, tamarind paste and cornflour thin it with 1/4 cup water and set aside.
• Cut and clean the crab ( regular way)
• Pour the oil into a pan Add the chopped red chilly and ginger garlic and sauté quickly until you can smell the spice
• Add the crab and stir-fry for another minute add salt pinch. Pour in the set aside sauce bowl and add 2 egg white and sugar and keep mixing it in the sauce continue cooking keep adding lil water as required, stirring often until the crab has absorbed the sauce cook for about 5 minutes until the sauce has thickened
• Then, add the freshly squeezed lime juice, spring onions and some fresh coriander.
• Once cooked, put the crabs in a big serving dish and drizzle the sauce on top. Then, sprinkle the rest of the chopped fresh coriander and serve it with steamed white rice.
• **Tip to make it more yummy:** *half boil the crab in water using 1 tsp black pepper powder*

## SHAKUN

SHAKUN---A feather in the cap of Pathare Prabhu Talent.This two act play is like the rising sun on the horizon of Marathi Theatre.Shakun has brought forward the immense talent hidden in the members of our community.It was an absolutely enjoyable play at Rangasharada on the 26th of May 2012. Kudos to Mrs.Pooja Amar Ajinkya for this great achievement.All the best to "Valay Pratishtan"for presenting many more shows of SHAKUN.

---from an ardent fan
**Achala Desai**

**WANTED GROOM FOR BRIDE**



**Swapna Rashmin Vijaykar**
Age: 29 years
Height: 5'6"
Wheatish Complexion
***Education:***
B.Com, BBY.'varsity
PGDBA(HR), Symbiosis Pune
***Service:***
BPO at Andheri, Mumbai
Salary: App. 2 Lacs/annum
***Expected:***
Graduate/Post Graduate, Own Premises preferred
***Contact:***
Mob:9423936129/9823724028
L/L: 02143-254976
Res:9423936119/9423936139
Mother: 9870916646

लेखांक ६

# चिमणीच्या दातांनी

## प्रेमात उसळून वर या

-कल्पना सुभाष कोठारे

आपण सगळेच एखादी सुंदर बाग पाहून प्रसन्न होतो. परंतु या सौंदर्यामागील अमाप कष्ट व जपणूक यांची आपल्याला क्वचितच जाणीव होते. खणून सैल केलेली माती, नेमके घातलेले खतपाणी, इतकेच नव्हे तर अळ्या, पांखरे, रोग यापासून केलेले झाडाचे संरक्षण, वेळोवेळी खुडलेली किडकी पाने, छाटलेल्या फांद्या- इतक्या साऱ्या कृती- त्या सुंदर बगीच्यामागे दडलेल्या असतात.

फळाफुलांचा सुगंध दरवळत ठेरणारी बाग म्हणजे माळ्याच्या निगराणीचे, बांधीलकीचे व चिकाटीचे फलित असते.

अशाच बांधिलकीतून प्रेम निर्माण होते. माणसाच्या सर्वांगीण स्वास्थ्यावर परिणाम करणारी भावना म्हणजे प्रेम होय. भावनिक स्वास्थ्य अनुभवीत, जीवन जगण्यासाठी प्रेम हा एक अत्यावश्यक घटक आहे. प्रेमानुभवाने चेहऱ्याचे सौंदर्य खुलते- सुंदर बागेसारखे! दुसरे एक सत्य म्हणजे प्रेम हे मागून मिळत नाही. आपण केलेल्या अतिसुंदर कृत्यांचा आविष्कार म्हणजे आपल्याला मिळणारे प्रेम असते. ('पेरिले तेचि उगवती. ये सद्भावाची प्रचिती' -कल्पना)

बऱ्याचदां, एखादा नवरा तक्रार करतो की त्याची बायको फारच कटकटी आहे. सारखी 'तुम्ही हेच करत नाही, तेच आणत नाही, इतरांचे नवरे पहा' वगैरे वगैरे! असे टुमणे लावते. दुसरा नवरा समजतो, आपली बायको निर्बुद्ध आहे. इतरांच्या कशा स्मार्ट आहेत, वगैरे! काही स्त्रियाही सतत तक्रार करीत असतात की त्यांचे नवरे काही ऐकतच नाहीत! उपक्षितांप्रमाणे त्या नवऱ्यांचे रागीट स्वभाव किंवा व्यसने- सहन करीत बसतात. याप्रमाणे नवराबायकोच्या नात्यात सतत तक्रारीचा सूर वाजत राहतो. सासूसुनेचे नाते तर यासाठी कुप्रसिद्धच आहे. गाढ मैत्रीतही कधीकधी ही तक्रारीची चुणी पडताना दिसते.

खरे तर या सर्व प्रकारात तक्रार करणाऱ्याला/रीला एक प्रकारचा सुप्त आनंद मिळत असतो. इतरांची सहानुभूती मिळवून आपण खूष होतो. 'तुझ्याशिवाय मन मोकळं करायला दुसरं कोणीच नाही गं!- अशी मल्लीनाथीही केली जाते.

खरे म्हणजे यावेळी आपण विसरून जातो की प्रत्येकातच काहीतरी उपजत दोष असतो. राजेशाही थाटात स्वत:चे दोष दुर्लक्षून, सहचराचे किंवा इतरांचे दोष आपण तक्राररूपाने दाखवीत राहतो. दुसऱ्यांकडे बोट करतांना, स्वत:कडे चार बोटे वळलेली असतात, हे आपण सोयिस्करपणे विसरतो.

वास्तविक आपल्या तक्रारी ऐकून घेणारे लोक आपल्या जीवनात काहीच बदल घडवू शकत नाहीत. जीवनबाग सुंदर बनविण्यासाठी ते लोक कुचकामीच ठरतात. इतरांजवळ नवऱ्याची, बायकोची, मित्राची, मैत्रिणीची , सासूची, सुनेची, नोकराची, बॉसची-कुणाचीही तक्रार करून आपण आपल्याच सकारात्मक विचारांना अडसर घालतो.

आपण येऊ घातलेल्या चांगल्या गोष्टींची वाट पाहत असतांना हातातील चांगल्या गोष्टी विसरून जातो. समजा, एखाद्या सेनाधिकाऱ्याला सज्ज करण्याकरिता शस्त्रास्त्रे व हाताखालील सैनिकांची तुकडी देण्यात आलेली आहे. त्याला देण्यात आलेल्या या दोन्ही गोष्टींवर तो नाराज आहे. तुकडीप्रमुख म्हणून झालेली त्याची नेमणूक ही आनंददायी घटना लक्षात न घेता तो जर फक्त कुरबूर करत राहिला तर शत्रूचाच विजय होईल नं? याउलट त्वरित स्वत:च्या अधिकारपदाचा उपयोग करून तो शत्रूवर चाल करून गेला तर तो नक्कीच विजयी होईल.

नेमके हेच आपल्या वैयक्तिक आयुष्यात घडते. आपण वेड्यासारखे काहीच न करता नुसत्या तक्रारी करत बसलो तर? आपली गाऱ्हाणी, गैरसमज स्वत:जवळच ठेवावेत. कबूल आहे. बरेचदा अनेक अडचणींमुळे जीवन असह्य होते. परंतु जीवनाच्या चेंडुला कसा टप्पा द्यायचा, हे आपणच ठरवू शकतो. बॉलला टप्पा देत मोजण्याचा एक खेळ असतो. टप्पा चुकल्यास बॉल घरंगळत दूर जातो व हरवतो. टप्पा चुकला तरीही वाकून बॉल परत मिळवून टप्पा परत सुरू करता येतो. जीवनातही असेच थोडे वाकावे लागते.

बागेच्या सौंदर्याआड माळ्याची बांधीलकी व जिद्द असते. तसेच आपले जीवन सुंदर बनविण्यासाठी आपल्या नसा सैल करून (रिलॅक्स), विश्वास, श्रद्धा, प्रार्थना यांचे खत घालून, सकारात्मकतेचे पाणी घालून, सलणाऱ्या आठवणींचे तण उपटून, दु:खद प्रसंगाच्या फांद्या छाटून 'लोक काय म्हणतील?'- या रोगापासून बचाव करीत सतत झटायचे असते. जीवनबाग प्रेमाने फुलवायची असते.

माळ्याच्या बांधीलकीने (कमिटमेंट), चिवटपणाने (डेडिकेशन), नवराबायको (सासू-सून वगैरे वगैरे) हे बागकाम करू शकतात. तणविरहित, कचरा न साठलेली सुंदर, सुवासिक फळाफुलांची बहरलेली बाग जशी दिसते तसेच आपले जीवन मनमोहक दिसू लागते. 'वा!' असा इतरांकडून सहजोद्गार, ती सुंदर जीवनबाग बघताना येतोच. चला तर मग प्रेमाचा चेंडू टप्प्याटप्प्याने सतत उसळत ठेवू या!

('हितवाद नागपूर' या वृत्तपत्रातील विनिता सॅबेस्टिअन यांच्या 'बाऊन्स बॅक इन लव्ह' या लेखावर आधारित प्रस्तुत लेख आहे.)

*

(पान २ कॉलम ३ वरून)

दाखवे तेव्हा लोकांना आश्चर्यच वाटायचं कारण ग्रेसची कविता दुर्बोध मानली जायची ना?

त्या काळात माझी आणि ग्रेसची प्रत्यक्ष भेट एकदोनदाच झाली असेल. पण निव्वळ पत्रव्यवहारातून आमचा ऋणानुबंध चांगलाच दाट झाला होता.

आणि त्यानंतर तब्बल ३० वर्षांनी आमची पुन्हा एकदा भेट झाली ती दादरच्या साहित्य अकादमीच्या कार्यालयात. सभागृहात सुमारे २०० माणसे उपस्थित होती. ग्रेस घशाच्या कर्करोगाने ग्रस्त होते तरीही दीड तास न थांबता बोलले. विशेषत: तरुण रसिकांवर तर गारुडच केलं आणि समारंभ आटोपल्यावर मी जेव्हा त्यांना भेटायला गेले तेव्हा माझ्या आयुष्यातला मला सर्वात अवघडून टाकणारा क्षण सामोरा आला. ग्रेसनी मला पाहताच काही न बोलता माझे पाय धरले आणि मला गोंधळून गेलेली पाहताच साहित्य अकादमीच्या अधिकाऱ्यांपासून सर्वांना माझी ओळख करून दिली, 'ह्या मृदुलाबाई जोशी. ह्या नसत्या तर 'चर्चबेल' आणि 'चंद्रमाधवीचे प्रदेश' निघालीच नसती.' काय म्हणावं ह्या कृतज्ञताबुद्धीला!

ग्रेसविषयीची आणखी एक आठवण सांगावीशी वाटते.

१९७८ सालची गोष्ट. श्रेष्ठ गुजराती कवी उमाशंकर जोषी यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांनी त्या संपूर्ण रकमेचा एक ट्रस्ट निर्माण केला आणि त्यातून एक भव्य योजना उभारली. निरनिराळ्या भारतीय भाषांमधले मोठे कवी निवडून त्यांच्या कवितांचे गुजरातीत अनुवाद करून घ्यायचे आणि ते प्रकाशित करायचे अशी ती योजना होती. मराठीतून विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट आणि ग्रेस निवडले गेले. ग्रेसच्या कवितांचं भाषांतर करण्याची कठीण कामगिरी गुजराती कवी जगदीश जोषी यांनी स्वीकारली. कवी सुरेश दलाल यांच्या मदतीनं त्यांनी ती पारही पाडली. पण ग्रेसच्या कवितांमधल्या काही प्रतिमा किंवा कल्पना त्यांना नीटशा उमगत नव्हत्या, म्हणून त्यांनी ग्रेसला नागपूरला पत्र लिहून त्यांचा उलगडा करावा अशी विनंती केली. ग्रेसनं काय करावं? त्यांना सरळ सांगितलं की, 'मुंबईत मृदुलाबाई जोशी आहेत. त्यांना भेटा. माझी कविता त्यांना चांगली कळते. त्याच तुम्हाला समजावून सांगतील.' लगेच जगदीश जोषीनी मला फोन केला आणि सुरेश दलाल आमि ते मला भेटायला आमच्या घरी आले. चांगले तीन तास बसले. त्यांच्या अडचणी समजावून सोडवून घेतल्या. आणि समाधानाने परत गेले. अशा आमच्या दोन बैठका झाल्या. पुस्तक प्रकाशनाचा भव्य सोहळा मुंबईच्या बिर्ला क्रीडा केंद्रात झाला. त्याला मी ग्रेसची प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले आणि प्रतिभाताई पाटील यांच्या शेजारी बसून सोहळ्याचा आनंद लुटला. मात्र खरा आनंद झाला तो ग्रेसनी माझ्यावर जो विश्वास दर्शवला त्याचा!

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १२ ऑगस्ट २०१२ रोजी दुपारी ४.०० वाजता प्रभु सेमिनरी शाळेचे सभागृह, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार, मुंबई-४००००२ येथे घेण्यात येईल. सर्व सभासदांनी उपस्थित राहावे. त्याच दिवशी वक्तृत्व स्पर्धा, स्मरणशक्ती स्पर्धा व फॅन्सीवर्क स्पर्धा घेण्यात येतील.

ज्या मुलींना शिष्यवृत्तीचे अर्ज भरावयाचे असतील त्यांनी ते ३१ जुलैपर्यंत सौ. मेघना राणे ल्ब्लॉक क्र. १, पहिला मजला, श्री सिद्धरूढ प्रसाद, ३६२, जगन्नाथ शंकरशेट रोड, मुंबई-४००००२ येथे आणून द्यावेत. तसेच मुलींच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी महिला समाजाचे आर्थिक सहाय्य मिळू शकेल, याची कृपया नोंद घ्यावी.

शुक्रवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता पाठारे प्रभु सोसायटीचे सांस्कृतिक केंद्र सभागृह, १२वा रस्ता, खार (प.) येथे अधिक मासानिमित्त हळदीकुंकू समारंभ साजरा करण्यात येईल. त्याचदिवशी फॅन्सीड्रेस स्पर्धा घेण्यात येईल.

## परीक्षेतील सुयश

**बी. कॉम**

अक्षय अंजन कोठारे, गुण ३९७/७००

**एचएससी**

अमोल अमित धैर्यवान ७० टक्के

❁ १ मे रोजी श्री. आनंद दत्तकुमार धराधर यांच्या अध्यक्षतेखाली 'प्रभुप्रभात'चा वर्धापन दिन आणि पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. पुरस्कार विद्येश्वरी प्रतिष्ठानतर्फे श्री. मधुकर आणि सौ. प्रमिला तळपदे यांनी प्रायोजित होते. याप्रसंगी 'कथा' नाटक सादर झाले.

## प्रभुतरुणास देणगी

❁ कै. रमेश गजानन जयकर यांच्या ६ जून २०१२ रोजी असणाऱ्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त त्यांचा नातू कपिल श्रीनाथ जयकर आणि नात श्रद्धा लोकेशप्रभाकर यांजकडून रु.१००१/-

❁ डॉ. श्रीम. मीनाक्षी शिवनाथ देसाई यांजकडून त्यांचा नातू चि. मोहक (डॉ. सौ. आश्विनी आणि डॉ. मिलिंद वाघ यांचा पुत्र) यास आयसीएसई परीक्षेत बकिन हाय शाळेतून सर्वाधिक गुण म्हणजे ९५ टक्के मिळाल्याप्रीत्यर्थ रु.५०१/- मोहकचे अभिनंदन

❁ श्रीम. प्रतिभा रवींद्र जयकर यांजकडून त्यांची मुलगी हिमांगी यांना मुलगी झाल्याबद्दल रु.५०१/- (हिमांगीच्या मुलीचे नाव 'आभा' ठेवण्यात आले. प्रतिभा आणि हिमांगी यांचे अभिनंदन)

❁ चि. भौतिक विनय राणेकडून त्यांचे आजोबा कै. यशवंतराव वामनराव राणे यांच्या स्मरणार्थ रु.५०१/-

❁ श्री. अनिल पूर्णचंद्र राव यांजकडून त्यांची कन्या सो. नम्रता आनंद विजयकर हिला पुत्ररत्न झाल्याबद्दल रु.५००/-

❁ श्री. र. के. विजयकर यांजकडून जाहिरातीप्रत्यर्थ रु. ५००/-

❁ श्री. मनिष सुबोध मानकर यांजकडून सौ. मोनिका सुबोध मानकर यांच्या स्मरणार्थ रु. २५१/-

❁ कै. सुधा वसंत सेंजित यांच्या प्रथम वर्ष श्राद्धदिनानिमित्त त्यांच्या कन्या सुरेखा आणि सरोज सेंजितकडून रु. २५१/-

❁ सौ. अश्विनी दीप विजयकर या एम.बी.ए. परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल श्री. दीप नंदकुमार विजयकर यांजकडून रु.२०१/-

## पाठारेप्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजातर्फे अभंग यात्रा दि. ७ जुलै, २०१२ रोजी दुपारी ४ वाजता व्यंकटेश मंदिर, ठाकुरद्वार येथे आयोजित केली आहे, तरी त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा. इच्छुक गायकांनी अधिक माहितीसाठी चिटणीसांकडे संपर्क साधावा.

पाठारे प्रभु सोशल समाजाची एक दिवसीय वर्षा सहल दि. १५ जुलै, २०१२ रोजी सभासदांसाठी आयोजित केली आहे. अधिक माहितीसाठी सं. चिटणीसांकडे संपर्क साधावा. (सौ. नीता सेंजित-९८२०१६६६२८ व श्री. जयंत कीर्तिकर ९८६७९५८५३५)

पाठारे प्रभु सोशल समाजाच्या सर्व साधारण सभेची सूचना:-

समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ५ ऑगस्ट, २०१२ रोजी सायंकाळी ५ वा. प्रभु सेमिनरी शाळा सभागृह, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार येथे घेण्यात येईल. सर्व सभासदांनी उपस्थित राहावे.

सभेपुढील कामकाज

१) सूचना परिपत्रकाचे वाचन.

२) समाजाच्या रविवार दि. १४ ऑगस्ट २०११ रोजी झालेल्या वा. स. सभेची टिपणे वाचून मंजूर करणे.

## आम्ही कोकणात जावान इलो!

**-अचला सुभाष देसाई**

मे महिना सुरू झाला आणि कोकणात जायचे वेध लागले. सौ. आज्ञा लोके (मंदा अजिक्य) आम्हा नऊ सिनियर मंडळींना घेऊन त्यांच्या गावाकडे निघाल्या. मंडळी म्हणजे सोबत त्यांचे पती श्री. अच्युत लोके, श्री. उमेश व सौ. उर्मिला कोठारे, श्रीमती सुहासिनी कोठारे, श्रीमती प्रतिभा जयकर, श्रीमती अपर्णा कीर्तिकर, माझे पती सुभाष देसाई व मी. निसर्गाचे सौंदर्य टिपत, अनेक घाटांची वळणे घेत, देवगडला पोहोचायला आम्हाला रात्र झाली. उतरायचे ठिकाण मात्र सुखसोयींने परिपूर्ण होते, त्यामुळे थकवा त्वरित उतरला.

कोकण दर्शनातले पहिले ठिकाण होते पोखरबाऊचा सिद्धिविनायक. या देवळाच्या मागे होती ओंकारेश्वर, पांडवकालीन शिवपिंडी. याच परिसरात होती कासवपिंडी (कासवाच्या आकाराच्या खडकात एक पिंडी), गोकर्ण पिंडी, शेष कुंड आणि द्रौपदी कुंड. मात्र हे पर्यटन स्थळ थोडे दुर्लक्षित वाटले. थोड्या अंतरावर आहे लोकेंचे गाव- लिंगडाळ. आंब्याच्या व काजूच्या बागामध्ये आहे त्यांच्या कुटुंबाचे श्री गणेश मंदिर. इथे माघी गणेश जयंतीला मोठा उत्सव असतो.

काहीश्या अंतरावर आहे मिठबाव. तिथल्या गजबादेवीचे दर्शन घेतले. या देवीचे मंदिर एका टेकडीवर आहे. तिथून खाली नजर पडली समुद्र किनाऱ्यावर-निळे पाणी व पांढरी वाळू! वाह! गोव्याचा अंजुना बीच आठवला. लिंगडाळमधील सर्व लोके परिवारांशी भेट झाली. त्यांचे अगत्य पाहून व पाहुणचार घेऊन मन तृप्त झाले.

संध्याकाळ होताच आम्ही गेलो हिंदळे गावाला. नवीन बांधलेल्या पुलावरून खाडी ओलांडली आणि थेट पोहोचलो मयेकरांच्या बंगल्यावर. त्यांनी आमचे स्वागत ताज्या शहाळ्यांनी केले. शेजारच्या हळदणकरांनी फणस गऱ्याची ताटं आणि आंब्याच्या कापट्यांची ताटं आणून ठेवली. एवढं खाऊनसुद्धा आम्ही मयेकरांकडे मासे खायला हजर! टायगर कोळंबी, तडफडीत बांगडे आणि सौदाळे, सोबत नाचणीची भाकरी व सोलकढी, वाह!

दुसऱ्या दिवशी सकाळी हापूस आंब्यांची न्याहरी करून आम्ही निघालो देवगड बंदराकडे. तिथे पाहिले कालवाचे खडक आणि गडावरली तोफ. शंकराच्या पिंडीपर्यंत जायला बऱ्याच उंच पायऱ्या चढाव्या लागल्या. तिथून खाली समुद्र अति सुंदर दिसला. इथेही निळे पाणी व सफेद वाळू. गावात लोकेंच्या बंधूंच्या घरी कोंबडी-वड्याचे भोजन वाट पाहत होते. द्वारका- प्रसिद्ध उद्योग मंदिरात थडकलो आणि स्त्रियांची खरेदी झाली सुरू. आंबा ज्यूस, जाम, बर्फी, पोळी, कोकम सरबत, आगळ इत्यादी.

मोकळी हवा, हिरवा परिसर, लाल माती, कौलारू घरं आणि प्रेमळ माणसे सोडून निघताना पाऊले जड झाली. पण करणार काय? कर्मभूमी परत बोलावत होती. परत पाऊले, नव्हे चाके फिरली घराकडे. परतीच्या प्रवासात अजून एकदा निसर्गाची छायाचित्रे मनाच्या कॅमऱ्यामध्ये साठवून आम्ही सर्व परत मुंबई-ठाणेकडे आलो; नाही इलो. अनेक गोड आठवणी मनात साठवून व गोड आंबे, फणस, चिक्कू, नारळ गाडीत ठेवून परत आलो रोजच्या शहरी जीवनाकडे. मनात विचार येतो- परत कधी बरं जाता येईल कोकणाकडे?

॥ श्री इंद्रायणीप्रसन्न ॥ ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

**प्रकाश कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :
**प्रवीण धुरंधर**
डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को- ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई- ४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

०८-०६-१२ सौ. करिष्मा आणि श्री. अमित प्रवीण शामराव वेलकर, पुत्र, महालक्ष्मी

### आत्याबाई नाव बोला

मेघनाद (वेदान्त) आनंद नैषध विजयकर
रिया श्रेयस उल्हास राणे

### नांदा सौख्यभरे

२४-०४-१२ श्री. दरवेश सुधीर राणे, कु. दीपाली व्यंकटेश शिरोडकर (आंतर्ज्ञातीय)

### विवाह सुवर्ण महोत्सव

०६-०५-१२ श्री. विजयकुमार प्रभाकर नवलकर, सौ. गीता विजयकुमार नवलकर (पूर्वाश्रमीच्या शोभना खंडेराव अजिंक्य)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०९-०५-१२ | श्री. आदित्य अतुल नायक | वय २७ | अंधेरी (प.) |
| १६-०५-१२ | सौ. मोनिका सुबोध मानकर | वय ६५ | अंधेरी (प.) |
| १६-५-१२ | श्री. शरोद गणपतराव प्रधान | वय ८० | अंधेरी (पू.) |
| २९-०५-१२ | श्री. मधुकर यशवंत तळपदे | वय ८४ | अंधेरी (प.) |
| ३०-०५-१२ | सौ. तरुबाला विजयकर | | अंधेरी (प.) |

❁ ३ जून रोजी पाठारे प्रभु चॅरिटीझची वार्षिक सर्वसाधारण सभा सुरेश विठ्ठल सभागृहात सायंकाळी ५ वाजता संपन्न झाली. सुरुवातीला चॅरिटीझचे विश्वस्त श्री. मधुकर यशवंत तळपदे यांच्या निधनानिमित्त उचित श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. विविध संस्थांच्या प्रतिनिधींनीही याप्रसंगी मधुकररावांच्या संदर्भात भावांजली अर्पण केली. सभेचे कामकाज सुरळीत पार पडले. चॅरिटीझचे अध्यक्ष श्री. अजित मोरोबा विजयकर यांच्या कारकिर्दीची ९ वर्षे (म्हणजे तीन कार्यकाळ) पूर्ण झाल्यामुळे यापुढे ते नियमानुसार अध्यक्ष असणार नाहीत. त्यांना चॅरिटीझने भेटवस्तू, पुष्पगुच्छ देऊन निरोप दिला. याप्रसंगी श्री. वीरपाल राणे यांनी श्री. अजित विजयकरांची यशस्वी कारकीर्द गौरवाने अधोरेखित केली आणि त्यांची संस्थेप्रती असलेली निष्ठा, कार्याची तडफ, घेतलेले निर्णय, त्यांच्या समर्पित वृत्तीमुळे संस्थेला झालेला फायदा आदीबद्दल श्री. वीरपाल भावपूर्ण बोलले. सभेस उपस्थित सर्व सभासदांचे ते जणू प्रातिनिधीक मनोगत होते. चॅरिटीझतर्फे दिनांक १७ जून २०१२ रोजी त्यांचा सत्कार अंधेरीच्या ज्ञातीसंकुलात आयोजित करण्यात आला आहे.